महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ 13 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 285 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कल्याण-आंबिवली -मुरबाड रेल्वे प्रकल्प गुंडाळणार?

## रेल्वे प्रशासनाची उदासीन भूमिका




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण आंबिवली - मुरबाड रेल्वे मार्ग रेल्वे प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे गुडाळला जाणार आहे. विश्वसनीय सूत्राकडून तशी माहिती मिळाली आहे. या प्रकल्पसाठी ना रेल्वे प्रशासनाने प्रयत्न केले ना रेल्वे ने नियुक्त केलेल्या येजन्सी ने प्रयत्न केले. त्यामुळे ठरवून दिलेल्या मुदतीत वन विभाग, पर्यावरण विभाग, भूमिआभिलेख विभागा कडून आवश्यक परवानग्या तसेच त्यांचे ना हरकत प्रमाण पत्र उपलब्ध करून देण्यात अपयश आले आहे. परिणामी हा रेल्वे मार्ग फक्त चर्चेत राहिला, कागदोपत्री शून्य कारवाई झाल्याने हा रल्वे मार्ग गुडाळला जाणार अर्थात रद्द केला जाईल अशी खात्रीशीर माहिती रेल्वेच्या वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांनी दिली. आंबिवली मुरबाड मार्गाचा प्रस्ताव रायते येथे वडोदरा मार्गाच्या क्रॉसिंगमुळे वादग्रस्त बनला होता. त्यामुळे येथील जागेचा प्रस्ताव दोनदा बदल करावा लागला. बदल केलेल्या जागेत आता उल्हासनदीच्या नवीन पुलाची अडचण होणार आहे. येथील वाढता खर्च रेल्वे प्रशासनाला परवडणारा नाही.वाढीव खर्चाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी घ्यावी लागते, त्यासाठी आवश्यक परवानग्या घेणे गरजेचे होते. मात्र भू संपादन नाही, आवश्यक परवानग्या नाहीत त्यामुळे रेल्वे प्रशासनाने या मार्गाची फाईलच बंद केली आहे. कल्याण मुरबाड रेल्वे मार्ग मंजूर झाला त्यानंतर अनेकांनी या मार्गासाठीच्या भू संपादनात लाखो रुपये खर्च करून केलेली इन्व्हेसमेंट वाया गेली आहे. हा रेल्वे मार्ग होणे स्वर्गीय शांताराम भाऊ घोलप यांच्यासह लाखो मुरबाडकराचे एक स्वप्न आहे. या मार्गाला कोणाचा विरोध ही नाही. मात्र रेल्वे मार्ग मंजुरीसाठी आवश्यक निधी, आवश्यक परवानग्या, भू संपादन या बाबीची वेळेत पूर्तता न झाल्याने या मार्गाला रेल्वे ने रेड सिग्नल च्या यादीत ढकलला आहे.

थोडक्यात महत्वाचे

## शिंदे गट विभागप्रमुख प्रमोद पांडेंवर हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. १२ (वार्ताहर) :** पक्षांतराच्या रागातून शिंदे गटाच्या विभागप्रमुखावर थेट लाकडी दांडक्याने हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्याने उल्हासनगरच्या शांततेला सुरुंग लागला असून शिवसेनेच्या दोन्ही गटांत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवसेना शिंदे गटाचे विभागप्रमुख प्रमोद पांडे यांच्यावर शुक्रवारी (ता. ११) रात्री हल्ला करण्यात आला. प्रमोद पांडे हे शहाड परिसरातील त्यांच्या निवासस्थानी जात असताना शिवसेना ठाकरे गटाचे माजी शाखाप्रमुख गौतम शरणदौर याने प्रमोद पांडे यांना फोन करून बोलवले. त्यांच्या डोक्यावर, पायावर जोरदार हल्ला केला. या अचानक झालेल्या हल्ल्यात पांडे रक्तबंबाळ झाले असून त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

प्रमोद पांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी ठाकरे गटातील काही कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. या पक्षांतराचा राग मनात धरूनच आपल्यावर हल्ला करण्यात आला, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या घटनेमुळे उल्हासनगरमधील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. शिंदे गटाच्या नेत्यांनी याचा तीव्र निषेध केला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, याप्रकरणी उल्हासनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर पोलिस यंत्रणा सतर्क झाली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे.

### भाजप आमदार महेश चौघुले यांच्या पुढाकाराने

## भिवंडीत क्रीडा महोत्सव

भिवंडी, ता.१२ (वार्ताहर) शहरातील क्रीडा खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देण्याकरिता 'भिवंडी ऑलम्पिक २०२५' या क्रीडा सोहळा भरवण्यात आला आहे. या क्रीडा महोत्सवाचे भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.

भिवंडी पश्चिमचे भारतीय जनता पक्षाचे आमदार महेश चौघुले यांच्या पुढाकाराने दहा दिवसीय क्रीडा महोत्सव भरवण्यात आला आहे. या माध्यमातून शहरातून अधिक चांगले क्रीडा नैपुण्य असलेले खेळाडू निर्माण होतील, असा विश्वास रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला. या क्रीडा महोत्सवामध्ये क्रिकेट, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, हॉलीबॉल अशा सांघिक खेळांसोबत अॅथलेटिक्स, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कॅरम अशा २५ क्रीडा प्रकारांमध्ये शहरातील हजारो क्रीडापटू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटनावेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली तर सहभागी संघांनी प्रथम संचालन करीत मान्यवरांना सलामी दिली आहे. यावेळी खेळाडूंनी मशाल घेऊन शहरातून भव्य रॅली काढण्यात आली होती. या सोहळयाला आयोजक आमदार महेश चौघुले, भाजप शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील, ठाणे शहराध्यक्ष संजय वाघुले, ज्येष्ठ माजी नगरसेवक संतोष शेट्टी, प्रकाश टावरे, नीलेश चौधरी, हनुमान चौधरी, प्रशांत लाड, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख प्रसाद पाटील यांसह खेळाडू, विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवरायांना महाराष्ट्रापर्यंत सिमीत ठेवू नका- अमित शहा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीनुसार पुण्यतिधी निमित्त श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. अमित शाहांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह उदयनराजे भोसले आणि शिवेंद्रराजे भोसले हे छत्रपती घरण्यातील वंशज देखील उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीनुसार पुण्यतिधी निमित्त श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. अमित शाहांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह उदयनराजे भोसले आणि शिवेंद्रराजे भोसले हे छत्रपती घरण्यातील वंशज देखील उपस्थित होते. देशाचे गृहमंत्री अमित शाह हे आज रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांची आज तिथीनुसार पुण्यतिथी आहे. त्यामुळे अमित शाह हे किल्ले रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीला अभिवादन करणार आहेत. रायगडावर जाण्यासाठी ते शुक्रवारीच पुण्यात दाखल झाले आहेत. पुण्यातील रिट्झ कार्लटन हॉटेल येथे शाह हे मुक्कामाला आहेत. शासकीय शिष्टाचारानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री मुरलीधर मोहोळ स्वागतासाठी उपस्थित होते.रात्री ११ वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील पुण्यात दाखल झाले. रात्री यांच्यात अनेक विषयांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. आता अमित शाह रायगड दौऱ्याच्या दरम्यान काय भाषण करणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

**रायगडावरील भाषणात एकनाथ शिंदेंनीही मांडलं मनोगत**
**रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक पाहिला. तसंच रायगडाने महाराजांचा शेवटचा दिवसही पाहिला. महाराज अवघ्या ५० व्या वर्षी वारले. ते आणखी २० ते ३० वर्षे जगले असते तर आपला सगळा इतिहास बदलून गेला असता असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचं तोरण बांधलं असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.**

### महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना टकमक टोकावरुन ढकललं पाहिजे हीच आमची भावना-देवेंद्र फडणवीस

उदयन महाराजांनी ज्या मागण्या केल्या आहेत त्याबाबत आम्ही योग्य कारवाई करणार आहोत. आमचं तर महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना टकमक टोकावरुन ढकलून द्यावं अशीच आमची भावना आहे. शिवस्मारक सुप्रीम कोर्टात अडकलं होतं. कुठल्याही परिस्थितीत हे स्मारक झालं पाहिजे ही आमची भूमिका असणार आहे. असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. तसंच दिल्लीत शिवस्मारक झालं पाहिजे ही मागणीही योग्यच आहे. आम्ही केंद्रीय गृहमंत्र्यांकडे हा विषय घेऊन जाऊ असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.



### आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून

## बदलापुरातील शाळांमध्ये 'शिवी मुक्त शाळा' अभियान



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** शालेय विद्यार्थ्यांमध्ये शिस्त लागावी व विद्यार्थ्यांनी एकमेकांशी बोलताना रागाच्या भरात देत असलेल्या शिव्या बंद व्हाव्यात यासाठी शिक्षकांनी आणि शाळेने पुढाकार घ्यावा. आणि प्रत्येक शाळा ही शिवीमुक्त शाळा व्हावी असे अभियान स्थानिक आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून बदलापूरातील शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. बदलापूर पूर्वेकडील आदर्श महाविद्यालयाच्या सभागृहात या संदर्भात बदलापूर आणि परिसरातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांची एक सभा नुकतीच आमदार किसन कथोरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळेस कुळगांव बदलापूर नगरपालिका आणि अंबरनाथ पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी व विविध शाळांचे मुख्याध्यापक आणि प्रमुख शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना शाळेत आल्यानंतर आपुलकीची भावना निर्माण व्हावी. त्यांना सुसंस्कृत घडवण्याचे काम हे शिक्षकांचे आहे. शिक्षक ती जबाबदारी अत्यंत योग्यरीत्या पार पाडत असतात. मात्र सध्या मोबाईलचा युग आणि विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यासाठी त्यांना मारण्याचे प्रकार बंद झाले आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थी हे गैरवर्तन करत असतात. त्यातच शिवीगाळ करून मारहाणी करण्याचे व भविष्यात हेच विद्यार्थी गुन्हेगार होण्याचे प्रमाण वाढले आहे. आणि हे प्रमाण रोखण्यासाठी मुलांचे भविष्य घडविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मनात असलेली शिवीची भावना बंद व्हावी या हेतूने शिवीमुक्त शाळा अभियान राबविण्याची संकल्पना आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केली. आणि अंबरनाथ पंचायत समितीच्या माध्यमातून शिक्षण विभागाच्या वतीने बदलापूर शहरात राज्यात पहिलाच असा "शिवीमुक्त शाळा" अभियान सुरू करण्याचा संकल्प शुक्रवारी बदलापूर येथे झालेल्या बैठकीत करण्यात आला.

या संदर्भात शिक्षकांना योग्य ते प्रशिक्षण देऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांची समजूत काढण्यापासून ते शिव्या देणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यापासून परावृत्त करण्यापर्यंत तसेच त्याप्रसंगी विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई व पालकांना शाळेत बोलून समज देण्यापर्यंत विविध मुद्दे या आराखड्यात घेण्यात आले आहेत. तसेच या अभियानात एक समिती नेमली जाणार असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी या अभियानाचा निश्चित फायदा होईल असा विश्वास यावेळी आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केला. बदलापूर शहर आणि ग्रामीण परिसरातील शाळांनी या अभियानासाठी दिलेल्या भरभरून प्रतिसादा बद्दल त्यांनी शिक्षक आणि मुख्याधिकांचे आभार व्यक्त करत विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी शाळा आणि शिक्षकांनी पुढाकार घ्यावा त्या संदर्भासाठी आमदार आणि शासन म्हणून आपण खंबीरपणे पाठीशी उभे राहू असा विश्वासही यावेळेस आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केला.

# ठाणे - बोरीवली भुयारी मार्गाविरोधात जनक्षोभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** राज्य सरकारचा अंत्यय बहुचर्चित प्रकल्प असलेल्या ठाणे बोरीवली भुयारी मार्गाविरोधात शनिवारी मुल्लाबाग येथील रहिवाशांनी रस्त्यावर उतरत आंदोलन केले. मार्गाच्या कामामुळे धूळ प्रदूषण, वाहतूक कोंडी वाढली असून त्याचबरोबर जुन्या वृक्षांवर कुऱ्हाड चालविण्यात आल्याचा आरोप रहिवाशांनी केला. धूळ प्रदूषणामुळे नागरिक आजारी पडण्याचे प्रमाण वाढले असल्याचे रहिवाशांनी सांगितले. हा मार्ग मुल्लाबाग येथून रस्त्यावरून नेण्याऐवजी मुल्लाबाग येथून युनी अपेक्स पर्यंत भुयारी मार्ग नेण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

मानपाडा भागात लगतचा मुल्लाबाग परिसर निसर्गाने नटलेला आहे. एकीकडे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे डोंगर आणि दुसरीकडे अनेक वर्ष जुन्या वृक्षांची हिरवळ यामुळे ठाण्याच्या इतर भागाच्या तुलनेत या भागात वातावरणमध्ये नेहमी गारवा असतो. येथील निसर्गसंपदा पाहून अनेकांनी या भागात गृहखरेदी केली. सुमारे १२ हजार नागरिक या भागात वास्तव्य करत आहेत. याच भागात एमएमआरडीएकडून ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाच्या निर्माणाचे काम सुरू आहे. ठाणे शहरातून बोरीवली १५ मिनीटांत गाठण्यासाठी एमएमआरडीएकडून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून भुयारी मार्ग तयार केला जात आहे. परंतु भुयारी मार्ग तयार करण्यापूर्वी एमएमआरडीएने या भागातील अनेक वृक्ष तोडले आहेत. याशिवाय, हा मार्ग मुल्लाबाग येथून रस्त्यावरून नेण्यात येणार असून येथे टोल नाका ही उभारण्यात येणार आहे. त्याचा त्रास येथील गृहसंकुलतील नागरिकांना सहन करावा लागणार आहे. मार्गाच्या कामामुळे येथून डम्परद्वारे मातीची वाहतूक केली जात असून दररोज शेकडो ट्रक येथून वाहतुक करतात. यामुळे नागरिकांना रस्ता ओलांडणे शक्य होत नाही. या वाहतुकीमुळे धूळ प्रदूषण, वाहतूक कोंडी वाढली आहे. त्याचबरोबर जुन्या वृक्षांवर कुऱ्हाड चालविण्यात येत आहे. यामुळे येथील हरित पट्टा नष्ट होत आहे. या विरोधात येथील रहिवाशांची एमएमआरडीएसोबत एक बैठक झाली होती. ठाणे-बोरीवली बोगद्याच्या भुयारी मार्गाला विरोध नाही, परंतु हा बोगदा मुल्लाबाग येथे संपणार आहे. त्यामुळे पुढील मार्ग हा भूतल होत आहे. हा मार्ग पूर्णपणे भूमिगत व्हावा अशी मागणी येथील रहिवाशांनी केली आहे. तसेच येथे छाटणी केलेल्या वृक्षांचे पूनर्रोपण संकुलाच्या आवारात करावे अशी मागणी देखील केली होती. परंतु त्यास एमएमआरडीएने कोणताही प्रतिसाद दिला नाही.

रातोरात येथील वृक्ष छाटण्यात आल्याचा आरोपही रहिवाशांचा आहे. या भुयारी मार्गासाठी गृहसंकुला लगतच्या रस्त्यावर टोलनाका देखील उभारण्यात येणार आहे. हा टोलनाका मुल्लाबाग बस आगाराजवळ हलविण्याची मागणी देखील रहिवाशांची आहे. त्यामुळे शनिवारी सकाळी येथील रहिवाशांनी मूक आंदोलन केले.



## वाचक मनोगत

### मोबाईलचा अतिरिक्त वापर मानसिक व्याधींचं कारण-प्रा. प्रज्ञा पंडित

"मोबाईलचा अतिरिक्त वापर हे मानसिक अस्थैर्याचे कारण ठरते. अनेक मानसिक व्याधी आणि त्यातून उद्भवणाऱ्या शारीरिक समस्यांचे मूळ हे या तंत्रज्ञानाच्या अतिवापरात आहे," असे स्पष्ट आणि ठाम वक्तव्य प्रा. डॉ. प्रज्ञा पंडित यांनी आपल्या मार्गदर्शनात केले. जैन कासार मंडळ, मुंबई यांच्या वतीने डोंबिवलीतील श्री सिद्धिविनायक सभागृहात भगवान महावीर जन्मकल्याणक उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. "डिजिटल डिटॉक्स सोशल मीडियाच्या मर्यादित वापराचे फायदे" या विषयावर त्यांच्या प्रभावी शैलीतील सादरीकरणाने उपस्थित श्रोते भारावून गेले.

आधुनिक युगातील तंत्रज्ञानाचा अतिरेक आणि सोशल मीडियामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक, सामाजिक परिणामांची सखोल मांडणी त्यांनी केली. मर्यादित मोबाईल वापराचे फायदे उलगडताना त्यांनी "डिजिटल डिटॉक्स जीवनाला दिशा देतो" असेही ठामपणे नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जैन कासार मंडळ मा. उपाध्यक्षा श्रीमती सविता चंद्रकांत साळवी होत्या. मंडळाच्या उपाध्यक्षा आणि कार्यक्रम समन्वयक म्हणून सौ. आशा मांगले यांनी अत्यंत नेटके आणि परिणामकारक नियोजन केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी अध्यक्ष श्री. अनिल बीजितकर आणि उपाध्यक्षा श्रीमती दिपाली महिंद्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन अत्यंत संयत आणि आकर्षक पद्धतीने श्री. राजेश भडाळे आणि सौ. जयश्री मांगले यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. अरुणा मांगले यांनी केले. महावीर जयंतीनिमित्त झालेला हा कार्यक्रम सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी आणि मार्गदर्शक ठरला.

सध्या मोबाईल हा तुमच्या आमच्या आयुष्यातला अविभाज्य घटक झाला आहे. सोशल मीडिया तर नित्यनियमाने लोक पाहतात. मात्र त्याचा अतिरिक्त वापर मानसिक अस्थैर्य आणणारा ठरतो आहे असं मत प्राध्यापिका प्रज्ञा पंडित यांनी डोंबिवली येथील कार्यक्रमात व्यक्त केलं. तसंच डिजिटल डिटॉक्स महत्त्वाचा आहे असंही त्या म्हणाल्या.

मंगला लक्ष्मिकांत दुराफे - नौपाडा, ठाणे

# १८ गावांची अनोखी पर्वणी ....

# श्रीझोलाई-सोमजाई देवीच्या यात्रेला प्रारंभ

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील आंबवली-वरवली गावच्या ग्रामदेवता माता झोलाई आणि सोमजाई देवीची त्रैवार्षिक यात्रा शनिवार १२ एप्रिल ते शुक्रवार १८ एप्रिल दरम्यान होणार आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पुणे-नाशिक येथूनही हजारो भाविक, गावकरी या यात्रौत्सवासाठी दाखल होत आहेत. चैत्र पोर्णिमा ते चैत्र पंचमी या दिवसांमध्ये होणाऱ्या या यात्रेचे वैशिष्ट्य येथील लाकडाची भव्य लाट नाचवण्याचा कार्यक्रम असणार आहे. तर आंबवली-वरवलीच्या आसपासच्या १८ गावांमधील पालख्यांचे एकाच ठिकाणी दर्शनाची अनोखी पर्वणीही यानिमित्ताने भाविकांना अनुभवता येणार आहे. आंबवली-वरवली ग्रामस्थ या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आहेत.

सह्याद्रीच्या पायथ्याशी वसलेल्या आंबवली गावची ग्रामदेवता माता झोलाई देवी आणि वरवली गावची सोमजाई देवी या दोन ग्रामदेवतांची त्रैवार्षिक यात्रा आंबवली झोलाई देवीच्या मंदिरामध्ये आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेसाठी राज्यातील विविध भागांमध्ये नोकरी









**कोकणातील यात्रेचा थरार अनुभवण्याची संधी या निमित्ताने मिळणार असून भाविकांनी तीन वर्षानंतर येणाऱ्या या यात्रेला उपस्थिती लावून यात्रेचा आनंद घ्यावा. पर्यटकांसाठीही हा उत्सव आनंददायी असल्याने हजारो पर्यटकही या यात्रेमध्ये सहभागी होत असतात. त्यामुळे मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील भाविकांनी या यात्रोत्सवाला उपस्थिती लावण्याचे आग्रहाचे निमंत्रण आंबवली ग्राम विकास समिती मुंबईच्यावतीने करण्यात आले आहे.**

व्यवसायासाठी गेलेले गावकरी आणि भाविक या यात्रेसाठी आंबवलीकडे रवाना होण्यास सुरूवात झाली आहे. या यात्रेची सुरूवात माता झोलाईच्या परवानगीने होत असून धार्मिक मान्यतेनुसार पारंपारिक पध्दतीने ही यात्रा आयोजित केली जाते. पौर्णिमेच्या दिवसापासून सुरू होणाऱ्या या यात्रेसाठी लाट नाचवण्याचा कार्यक्रम अत्यंत उत्साहवर्धक असतो. तरुणांच्या शक्तीचे आणि देवावरील भक्तीचा अभूतपुर्व सोहळा यानिमित्ताने पहायला मिळतो. सुमारे २२ फुटाहून अधिक लांबीच्या लाकडी लाटेचे गावातील प्रत्येक घराघरामध्ये दर्शन घडवले जाते. लाटेला हवेत खेळवण्याबरोबरच, लाटेच्या रेटारेटीतून शक्ती प्रदर्शनाचाही खेळ यानिमित्ताने खेळला जातो. आंबवली आणि वरवली या गावामध्ये लाट फिरवल्यानंतर ही लाट ग्रामदेवतेच्या मंदिरासमोर तयार केलेल्या सारावर (उंच जागेवर) चढवली जाते. १७ एप्रिल हा दिवस खऱ्या अर्थाने यात्रेचा दिवस असून त्या दिवशी वरवलीतील सोमजाई देवी आणि महाळुंग्यातील केदारनाथ यांची पालखीचे आगमन होणार आहे. त्याबरोबर आजुबाजुच्या गावांमधील ग्रामदेवतांच्या पालख्या झोलाई मंदिरात दाखल होणार आहेत. या पालख्यांच्या दर्शनासाठीही असंख्य भाविक मंदिराला भेट देतात. यंदा पुण्यातील अजिंक्य झांबरे यांच्या जल्लोष अप्सरांचा हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये युवा लावणी कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

# मुलींच्या लग्नातील खर्च टाळून समाज परिवर्तनाचा संदेश !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद (प्रतिनिधी)** येथील उद्योजक तथा शिवसेना (उबाठा) पक्षाचे पदाधिकारी दत्तात्रय ठाकरे यांनी आपल्या मुलींच्या लग्नातील खर्च टाळून होणाऱ्या खर्चातून मदत करीत समाज परिवर्तनाचा संदेश दिला आहे.

वासिंद येथील उद्योजक तथा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका पदाधिकारी दत्तात्रय ठाकरे यांनी अगोदर आपल्या मोठ्या मुलीच्या लग्नातील खर्च टाळून गरीब गरजू 53 वधू- वर जोडप्यांची लग्न स्वखर्चाने पार पाडली तर नुकतेच त्यांनी आपल्या दुसऱ्या मुलीचे लग्न नोंदणी विवाह पद्धतीने करुन लग्नातील होणारा खर्च टाळून आपली मुलगी व जावई त्यांच्या संसारासाठी भेट म्हणून 15 लाख रुपयांची मदत केली.

त्यामुळे या लग्न समारंभातील अनावश्यक खर्च व डामडौल टाळून त्यांनी मदतीसाठी पुढाकार घेत सामाजिक परिवर्तन घडवून आणले. दत्ताशेठ ठाकरे हे गेल्या पंचवीस वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत. पक्षीय राजकारणा बरोबरच ते विविध सामाजिक उपक्रम व गरजूंना मदत कार्यात सहभाग दाखवत आहेत. सध्या अनेकजण विवाह सोहळे भपकेबाज करीत मोठ्या प्रमाणात खर्च करतात. सामान्य कुटुंबातील लोक त्यांचे अनुकरण करतात व तथाकथित प्रतिष्ठेपायी कर्जबाजारी होतात. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी आपल्या मुलींच्या लग्नात होणारा अनावश्यक खर्च व डामडौल टाळून ठाकरे यांनी आपल्या पहिल्या मुलीच्या लग्नावेळी गरीब गरजू वधू- वर जोडप्यांची संपूर्ण खर्च करून लग्न कार्य पार पाडली. तर नुकतेच सर्व समारंभाचा फापटपसारा टाळून नोंदणी पद्धतीने विवाह करून दुसरी मुलगी व जावई त्यांच्या संसारासाठी आर्थिक मदतीची भेट देऊन वेगळा आणि सकारात्मक समाजपरिवर्तनाचा मार्ग दाखवून दिला आहे. त्यांच्या या कार्याची सर्वत्र वाहवा होत असून नुकतेच वृषाली महिला सामाजिक संस्थेने त्यांना " समाज परिवर्तन" पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

# पुढील आठवड्यापासून शिवसेनेच्या संपर्क अभियानाला सुरुवात - आमदार विश्वनाथ भोईर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पुढील आठवड्यापासून संपूर्ण महाराष्ट्रात संपर्क अभियान राबवण्याचा निर्णय शिवसेनेतर्फे मुंबईत झालेल्या बैठकीत घेण्यात आला असून कल्याण पश्चिमेतील 38 प्रभागांतही अतिशय परिणामकारकपणे त्याची अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती आमदार विश्वनाथ भोईर यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली. यावेळी शिवसेना उपनेत्या विजया पोटे, जिल्हा प्रमुख अरविंद मोरे उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संसद रत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे संपर्क अभियान राबविण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. तर हे संपर्क अभियान म्हणजे एकप्रकारे आगामी महापालिका निवडणुकांची नांदी असल्याची शक्यताही राजकीय तज्ञ व्यक्त करत आहेत. शिवसेनेतर्फे काल मुंबईमध्ये एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला शिवसेनेचे राज्यातील सर्वच आमदार आणि प्रमूख पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रात हे संपर्क अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. येत्या सोमवार - मंगळवारपासून राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात, जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात आणि मतदारसंघातील प्रत्येक प्रभागामध्ये या संपर्क अभियानाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात असलेल्या टिटवाळा येथील श्री महागणपतीचे दर्शन घेऊन या टिटवाळ्यापासून या संपर्क अभियानाला प्रारंभ होणार आहे. ज्यामध्ये आपल्यासह पक्षाचे सर्वच प्रमूख पदाधिकारी उपस्थित असणार असल्याचेही आमदार भोईर यांनी यावेळी स्पष्ट केले. दर दिवशी एक वॉर्ड अशा पद्धतीने कार्यकर्ते आणि तेथील नागरिक यांना एकत्रपणे भेटण्याचा कार्यक्रम आम्ही करणार आहोत. जेणेकरून कार्यकर्त्यांना त्यांचे मनोगत, अडीअडचणी, पक्षवाढीसाठी संवाद साधला जाईल.

त्यासोबतच दुसरीकडे संबंधित प्रभागातील सामान्य नागरिकांनाही या संपर्क अभियानात सहभागी होऊन त्यांच्या नागरी समस्या आणि अडीअडचणी शिवसेना पदाधिकाऱ्यांसमोर मांडता येणार असल्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले. कल्याण पश्चिमेतील सर्वच्या सर्व म्हणजे 38 प्रभागांमध्ये पुढील आठवड्यापासून हे अभियान राबविण्यात येणार असून ही एकप्रकारे आगामी महापालिका निवडणुकीची नांदी असल्याचे सूचक विधानही त्यांनी यावेळी केले.

# डोंबिवलीत मतीमंद शाळेतील मुलांचे स्नेहसंमेलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** येथील क्षितिज मतीमंद शाळेच्या विशेष मुलांचे नुकतेच स्नेहसंमेलन झाले.यावेळी या विशेष मुलांनी त्यांच्या क्षमतेनुसार आपल्यातील कलागुणांनाचे सादरीकरण केले.आणि त्यांच्या या कलागुणांची दखल स्वामींच्या घराच्या विश्वस्त माधवी सरखोत यांनी घेतली.! त्यांनी १० एप्रिल रोजी या विशेष मुलांना पालकांना व शिक्षकांना मिळून ८२ जणांना स्वामींच्या घरात बोलावून स्नेहभोजनाचे आमंत्रण दिले.

नवीन कपडे घालून ही विशेष मुले उत्साहाने आली होती.कुणीतरी आपल्याला श्रमपरिहारासाठी बोलावले आहे याचा अगम्य आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.प्रत्येकाने आपल्या पालकांच्या सहकार्याने स्वामींचे दर्शन घेतले व भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे.असा आशिर्वाद घेतला.

यानंतर माधवी सरखोत यांनी सर्वांचे स्वागत करून स्वामींच्या घराच्या कार्याची माहिती पालक व शिक्षकांना दिली.तसेच या विशेष मुलांनी बनवलेल्या वस्तूंसाठी मोफत विक्री केंद्र विशेष मुलांसाठी संस्कार केंद्र आणि स्नेहसंमेलनासाठी व इतर उपक्रमांसाठी स्वामींच्या घरात मोफत जागा उपलब्ध करून दिली जाईल असे आश्वासन देवून सामाजिक बांधिलकीचे नाते जपले.यावेळी बोलताना क्षितिज मतीमंद शाळेच्या संस्थापिका अध्यक्ष अनिता दळवी यांनी स्वामींचे आशिर्वाद आमच्या पाठीशी आहेत याचा आम्हाला आनंद झाला आहे तसेच नवनवीन उपक्रम करण्यासाठी आम्हाला प्रोत्साहन मिळाले आहे.आम्ही नक्कीच कृतज्ञ आहोत!असे विचार व्यक्त केले!

यावेळी या विशेष मुलांनी उत्स्फूर्तपणे आपले कलागुण सादर केले.यानंतर या मुलांना शिक्षकांना व पालकांना सुग्रास श्रपरिहाराचे भोजन देण्यात आले.विशेष म्हणजे जेवायच्या आधी सर्व मुलांनी हात जोडून वदनी कवळ घेता ही प्रार्थना त्यांना जमेल तशी म्हटली.या कार्यक्रमास क्षितिज संस्थेचे संचालक मंडळ.पदाधिकारी शिक्षक आवर्जून उपस्थित होते. वंदेमातरमने या आगळ्यावेगळ्या श्रमपरिहाराची सांगता झाली.

# दहागांव-वासिंद रिक्षा चालक-मालक संघटनेची स्थापना!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद ( प्रतिनिधी)** - रिक्षा चालक- मालक संघटना दहागांव-वासिंद या संघटना शाखेची स्थापना करण्यात आली आहे. दहागांव-वासिंद अशा फेऱ्यात अनेक रिक्षा असून सदर रिक्षा चालकांच्या असलेल्या समस्या व प्रवाशांचेही असलेल्या प्रश्नांचे निवारण व्हावे यासाठी कोकण विभाग रिक्षा- टॅक्सी महासंघाच्या अंतर्गत रिक्षा चालक-मालक संघटना दहागांव-वासिंद या शाखेची स्थापना करण्यात आली आहे.

या झालेल्या रिक्षा चालक-मालक दहागांव-वासिंद संघटनेच्या अध्यक्षपदी अशोक देसले, उपाध्यक्षपदी विजय धानके, मोहन धानके, सचिवपदी प्रमोद म्हात्रे, सहसचिव गोपाळ मसणे, खजिनदार भगवान गिते व सहखजिनदार विपुल धानके यांची निवड करण्यात आली आहे. या संघटना स्थापनावेळी संघटनेचे ठाणे ग्रा. जिल्हाध्यक्ष कृष्णा अंदाडे, संघटना शहापूर तालुका संस्थापक शिवाजी खारीक, संस्थापक अध्यक्ष अशोक शेट्टे, खातिवली-वासिंद सेवा सोसायटी संचालक जयराम पवार, उपसरपंच संजय पवार, सामाजिक कार्यकर्ते श्याम धानके, प्रविण देसले, लक्ष्मण शेलार, निखिल चंदे, कृष्णा परटोळे, दत्तात्रय मसणे, रमेश देसले, तानाजी मसणे आदीजण उपस्थित होते.

# वाशिंदच्या जिंदाल कंपनीत रक्तदान शिबीर संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे,दि.११ :- असे म्हणतात की, एका व्यक्तिने रक्तदान केल्यानंतर त्या रक्ताचे सर्व महत्त्वाचे घटक बाजूला करून पाच लोकांचा जीव वाचविला जाऊ शकतो. म्हणूनच "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" असे मानले जाते. ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना लागणाऱ्या रक्ताचा तुटवडा भासत असल्याने जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत काही दिवसांपूर्वी करण्यात आले होते.

या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देत उद्योग सहसंचालक विजू शिरसाट व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आख्यातारीत असलेल्या सर्व औद्योगिक आस्थापनांना रक्तदान शिबिर आयोजित करण्याबाबत प्रोत्साहनात्मक आवाहन केले. या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देत शहापूर तालुक्यातील वाशिंद येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीने आज त्यांच्या कंपनीत रक्तदान शिबिराचे आयोजन केले. यासाठी तेथील असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट, कॉर्पोरेट अफेयर्स चिन्मय पालेकर व जनसंपर्क अधिकारी श्री.अमेय यांनी मोलाची मदत केली. तरी, इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. तसेच रक्तदान शिबिर आयोजित करावयाचे असल्यास नागरिकांनी जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी गिरीश चौधरी (९८६९६८५२८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे आणि जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी समाजवादी पार्टीचा नवी मुंबई मनपावर मोर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आज समाजवादी पक्षाचे नवी मुंबई अध्यक्ष आर एन यादव यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई महानगरपालिकेसमोर मोर्चा काढण्यात आला. महानगरपालिका स्थापन होऊन ३३ वर्षे झाली तरी नवी मुंबईत आजपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवण्यात आलेला नाही. बाबासाहेबांचा पुतळा उभारण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला.

यामध्ये घर हक्क संघर्ष समिती देखील सहभागी झाली होती. नवी मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त पाळडे यांनी अर्ज स्वीकारला आणि तीन दिवसांच्या सुट्टीमुळे सोमवारी अधिकाऱ्यांशी चर्चा करून



सकारात्मक उत्तर दिले जाईल असे सांगितले. मोर्चा यशस्वी करण्यासाठी खजामिया पटेल, लालचंद यादव, चंद्रशेखर यादव, जितेंद्र यादव आदींनी सहकार्य केले. यावेळी सुमारे ५०० लोक उपस्थित होते. महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी आर एन यादव म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवला जात नाही तोपर्यंत समाजवादी पक्षाचा संघर्ष सुरूच राहील. कार्यक्रमात समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अखिलेश यादव जिंदाबाद आणि अबू असीम जिंदाबादच्या घोषणा दिल्याने समाजवादी वातावरण निर्माण झाले.

# गुंतवणूकदारांसाठी ठाणे जिल्ह्यात पोषक वातावरण

## - जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, दि.12 :** ठाणे जिल्ह्यातील गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे आणि अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि.11एप्रिल,2025 रोजी अतिरिक्त अंबरनाथ, MIDC, आनंद नगर येथे एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे होते. या बैठकीत अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक संघटना, मुरबाड औद्योगिक संघटना, पुनधे शहापूर औद्योगिक संघटना, आसनगाव औद्योगिक संघटना आणि जिल्ह्यातील इतर प्रमुख उद्योजक सहभागी झाले होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी महाराष्ट्र शासनाच्या 100 दिवसांच्या कार्यक्रमाची माहिती दिली आणि शाश्वत विकासासाठी मानक कार्यप्रणालीची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी विविध औद्योगिक संघटना आणि उद्योजकांनी मांडलेल्या सर्व समस्यांवर योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. आसनगाव येथे लवकरच अग्निशमन दल स्थापन करण्यात येईल, असेही त्यांनी जाहीर केले. तसेच, ठाणे जिल्ह्यातील गुंतवणूकदार आणि उद्योजकांना येणाऱ्या अडचणींसाठी वेळोवेळी सहाय्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली, ज्यामुळे जिल्ह्यात उद्योग वाढीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण होईल.

यावेळी ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. स्वामी यांनी उद्योजकांच्या समस्यांचे खेळीमेळीच्या वातावरणात निराकरण केले. त्यांनी उद्योगांना औद्योगिक सुरक्षिततेसाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आणि 'माझी सुरक्षा, माझी जबाबदारी' हे सूत्र पाळण्याचे महत्त्व सांगितले. उद्योग आणि प्रशासनाने परस्परांच्या सहकार्याने काम करावे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच, ठाणे ग्रामीण पोलीस यांच्या संकेतस्थळावर उद्योग संबंधित तक्रारींसाठी नवीन पर्याय उपलब्ध करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. बैठकीचे प्रास्ताविक करताना जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती सोनाली देवरे यांनी महाराष्ट्र शासनाच्या 100 दिवसांच्या कार्यक्रमातील 7 कलमी कृती आराखड्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या अंतर्गत जिल्ह्यात 65 सामंजस्य करार झाले असून त्याद्वारे सुमारे 4 हजार 896 कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे, ज्यामुळे जवळपास 68 हजार रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. तसेच, 2024 या वर्षामध्ये झालेल्या सामंजस्य करारांपैकी 95 % करार पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहेत, असेही त्यांनी नमूद केले. श्रीमती देवरे यांनी ठाणे जिल्ह्यातील 11 MIDC आणि जिल्हा उद्योग मित्र समितीच्या माध्यमातून दर तीन महिन्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योजकांच्या समस्यांचे निराकरण कसे केले जाते, याबद्दलचीही माहिती दिली. यासोबतच, MAITRI कायदा 2023 आणि MAITRI संकेतस्थळाद्वारे पुरविण्यात येणारी एक खिडकी योजनेची माहिती तसेच ठाणे जिल्ह्याचा विशेष प्रकल्प 'ODOP – Millets' ची सद्यःस्थिती आणि त्यासंबंधी उद्योजकांना मार्गदर्शन केले. मुरबाड औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष श्री. उत्तमानी यांनी वाढत्या विजेच्या दरांबाबत आणि माथाडी कामगार कायद्यात सुधारणा करण्याची मागणी केली. शहापूर औद्योगिक संघटनेचे श्री. मनोज पाटील आणि TISSA औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी शहापूरमधील उद्योजकांना अपुरा वीज आणि पाणीपुरवठा तसेच ESIC रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या कमतरतेबद्दल अध्यक्षांचे लक्ष वेधले.



रविवार

१३ एप्रिल २०२५

**मेष**

वेळीच काळजी घेतल्याने आजार लवकर बरा होईल. तुम्ही प्रवास करत असाल तर काळजी घ्या.

**वृषभ**

आज तुमची मेहनत फलदायी ठरेल. तुमचे मन अध्यात्मात अधिक व्यस्त राहील. देवघरात फूल ठेवा.

**मिथुन**

आज तुम्ही अधिक प्रेरित व्हाल, आज तुमचा प्रभाव वाढेल. जुना तणाव संपुष्टात येईल.

**कर्क**

संभ्रमाची स्थिती संपेल. आज तुम्हाला काही कामातून फायदा होणार अपूर्ण काम पूर्ण होईल.

**सिंह**

बँकिंग क्षेत्राशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे. पदोन्नतीची संधी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या**

दिवस तुमच्यासाठी चांगला जाईल. आर्थिक बाजू जोमाची राहील. पालकांचे मत प्रभावी ठरणार

**तूळ**

आर्थिक लाभाच्या नवीन शक्यता निर्माण होतील. अभियंत्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृश्चिक**

या राशीच्या लोकांनी आज हुशारीने काम केले तर तुम्हाला नक्कीच फायदा होईल. त्रास नकोसा होईल.

**धनु**

आज खर्चात वाढ झाल्याने बचत करणे कठीण होईल. आज भाग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल.

**मकर**

जोडीदार काहीतरी करेल ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. व्यवसायात फायदेशीर गोष्टी समोर येतील.

**कुम्भ**

भविष्यात फायदेशीर ठरतील असे निर्णय घ्याल. काही नवीन काम सुरू करणे तुमच्यासाठी हितवाह होईल.

**मीन**

कुठेतरी सहलीला जात असाल तर ते फायदेशीर ठरणार आहे. आज आरोग्य थोडे ढासळू शकते.



# उल्हासनगर आयुक्तांच्या पाहणी दौऱ्याने ठेकेदारांचे धाबे दणाणले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

उल्हासनगर महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी वालधुनी नदीवरील पूल, अग्निशमन दलाचे नवीन कार्यालय, स्मार्ट पर्किंग आदी विकास कामाची पाहणी. केली. आयुक्तानी पाहणी करीत मुदतीत सर्व विकास कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले आहे.

उल्हासनगर रेल्वे स्टेशनला जोडणारा वालधुनी नदीवर बांधलेला पूल, पुलाच्या दोन्ही बाजूच्या दुभाजकावर केलेली रंगरंगोटी, वालधुनी नदीची पावसाळ्यापूर्वी केली जात असलेली साफसफाई, स्टेशन परिसरातील स्मार्ट पार्किंग व्यवस्था, गणेश विसर्जन घाट, परिवहन बस आगाराचे काम आदी कामाची आयुक्त मनीषा. आव्हाळे यांनी पाहणी करून मुदतीत काम पूर्ण करण्याचे आदेश दिले. याठिकाणी वालधुनी नदीला संरक्षण भिंत बांधण्याचे कामही सुरु आहे. याबाबतही सबंधित अधिकारी व ठेकेदाराला आयुक्तानी सूचना दिल्या आहेत.

कॅम्प नं-३ याठिकाणी नवीन अग्निशमन इमारत बांधण्यात आले असून इमारतीची पाहणी करून विभागाची नवीन फायर वाहने लावणे. याबाबत सूचना दिल्या आहेत. शहाड रेल्वे स्टेशन येथील पुलाखालील मोकळया जागेवर स्मार्ट पार्किंग बनविणे व परिसराचे सुशोभीकरण करण्याच्या आदेश दिले. यावेळी अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप जाधव, मुख्य स्वच्छता निरीक्षक एकनाथ पवार यांच्यासह सबंधित अधिकारी, ठेकेदार आदिजण उपस्थित होते.

# मोहाने येथील विजय मोरे आत्महत्या प्रकरणी सावकारावर गुन्हा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :-** मोहने परिसरात काही दिवसांपूर्वी झालेल्या विजय मोरे यांच्या आत्महत्या प्रकरणी खडकपाडा पोलिसांनी महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. मयत विजय मोरे यांच्या भावाने दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, पोलिसांनी सचिन दळवी व एका महिला सावकाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सचिन दळवी या सावकाराने विजय मोरे यांच्या घरी जाऊन त्यांना मारहाण व शिवीगाळ केली होती, असा आरोप मयत विजयची पत्नी व भाऊ राजू यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय मोरे यांनी काही दिवसांपूर्वी सावकाराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली होती. तसेच आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी आपल्या खिशामध्ये चिठ्ठी लिहून ठेवली होती. या घटनेनंतर त्यांच्या कुटुंबीयांनी घरी येऊन शिवीगाळ करणाऱ्या सावकारावर संशय व्यक्त केला होता. विशेषतः विजय मोरे यांचे भाऊ राजू मोरे यांनी खडकपाडा पोलिसात सातत्याने जाऊन पाठपुरावा करून तक्रार दाखल केली. आपल्या तक्रारीत राजू मोरे यांनी मिलिंद नगर येथील सचिन दळवी आणि एका महिलेवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी सांगितले की, हा सावकार अवाजवी व्याज आकारून जबरदस्तीने माझ्या भावाकडून पैशाची वसुली करत होता. आत्महत्या करण्याच्या चार दिवसापूर्वी सावकार आणि घरी येऊन शिवीगाळ तसेच मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर तीनच दिवसांनी सावकाराच्या दबावामुळे विजय मोरे यांनी आत्महत्या केली असा संशय कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.

राजू मोरे यांच्या फिर्यादीनंतर पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. प्राथमिक तपासात कुटुंबीयांनी केलेले आरोप आणि परिस्थितीजन्य पुरावे यांच्या आधारे पोलिसांनी संबंधित सावकार व महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींविरोधात मारहाण, शिवीगाळ आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे कल्याण-मोहने परिसरात खळबळ उडाली आहे. अनेक दिवसांपासून या भागातील नागरिक सावकारांच्या मनमानी कारभाराबाबत तक्रारी करत होते. विजय मोरे यांच्या आत्महत्या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे आता या सावकारांवर कठोर कारवाई होईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉक्टर अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक घस्ते मॅडम करत असून, लवकरच आरोपींना अटक करण्याची शक्यता आहे. विजय मोरे यांच्या कुटुंबीयांनी न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली असून, पोलिसांनी या प्रकरणी निष्पक्ष आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मोहने शहर अध्यक्ष माजी नगरसेवक महेंद्र गायकवाड यांनी केली आहे.

# ठाणे कॉंग्रेसची आढावा बैठक संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे 12.एप्रिल :** प्रदेश कॉंग्रेस चे अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी राज्यस्तरावर पक्षसंघटना मजबूत करण्याचा विडा उचलला असून.यासाठी पक्ष संघटनेचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय जिल्हावार निरीक्षकांची नियुक्ती केलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून ठाणे कॉंग्रेस ची आढावा बैठक ज्ञानराज सभागृह , पाचपाखाडी, ठाणे येथे शहर कॉंग्रेस प्रभारी, प्रदेश उपाध्यक्ष शरद अहेर,नवनियुक्त निरीक्षक झीशान हुसेन, प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत पाटील,प्रदेश सचिव संतोष केणी यांच्या प्रमुख उपस्थितीत व ठाणे कॉंग्रेस चे अध्यक्ष विक्रांत चव्हाण, यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी ठाणे कॉंग्रेस चे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी चित्रफितीसह कॉंग्रेस पक्षाची वाटचालीचे सादरीकरण करून आजपर्यंत केलेली आंदोलने, निषेध मोर्चे मासिक बैठका याची सचित्र माहिती विशद केली.

या वेळी मार्गदर्शनपर भाषण करतांना डॉ झीशान हुसेन त्यांनी सांगितले की मी प्रदेश कॉंग्रेस व आपल्या मधील दुवा म्हणून येथे आलो असून कॉंग्रेस च्या प्रत्येक कार्यकर्त्याशी संवाद साधणार असून तुमचे म्हणणे सूचना मी प्रदेशाध्यक्षांपर्यंत पोहोचण्यासाठी आलेलो आहे.तसेच यावेळी कार्यकर्त्यांना नव्या उमेदीने आणि एकजुटीने काम करण्याचे आवाहन देखील त्यांनी केले.यावेळी कॉंग्रेस चे निरीक्षक या नात्याने त्यांनी ब्लॉक अध्यक्षांशी संवाद साधत संघटनात्मक बांधणीचा आढावा घेतला व दुसऱ्या टप्प्यात ठाणे शहर कॉंग्रेस अंतर्गत प्रत्येक ब्लॉक स्तरावरील बैठका घेणार असून सर्व कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असल्याचे सांगितले.

या प्रसंगी बोलताना प्रदेश उपाध्यक्ष व ठाणे प्रभारी श्री शरद अहेर म्हणाले की कॉंग्रेस हा सर्वसामान्यांचा आणि सर्वधर्मसमूहाचा विचार मांडणारा पक्ष आहे. गांधी विचारसरणीची,सर्वसामान्य व्यक्ती हर्षवर्धन सकपाळ आपल्याला प्रदेशाध्यक्ष म्हणून लाभलेले आहेत. संकटाच्या काळात जे पक्षाला सोडून गेले त्यांना जाऊ द्या पक्षाला काही फरक पडत नाही.पक्षाचा कणा असलेला कॉंग्रेसचा कार्यकर्ता मुख्य प्रवाहाशी जोडून आपल्याला जोमाने काम करायचे आहे. येणारे दिवस हे कॉंग्रेस चे आहेत. कॉंग्रेस पक्षाच्या विचारधारेनुसार सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर काम करण्याचा निर्धार बैठकी वेळी करण्यात आला. या बैठकीस कॉंग्रेस चे आजी माजी नगरसेवकांसह विविध फ्रंटल व सेलचे पदाधिकारी तसेंच सर्व स्तरातील कॉंग्रेस पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# युवासेना ठाणे जिल्हा प्रमुख पदी भुषण जाधव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**.टिटवाळा :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने युवा सेनेचे नेते अदित्य ठाकरे यांनी भिवंडी लोकसभेतील युवा सेनेच्या पदधिकारी नियुक्ती जाहीर करण्यात आलेल्या आहेत,भिवंडी लोकसभेतील येणार मतदार संघ कल्याण पश्चिम व मुरबाड विधानसभा हया विधानसभेच्या जिल्हा प्रमुख पदि फळेगाव येथील युवा कार्यकर्ता तसेच कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व युवा नेतृत्व भुषण जाधव यांची नियुक्त करण्यात आली आहे.

भुषण जाधव यांनी सांगितले की शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवा नेतृत्व अदित्य ठाकरे यांनी माझ्यावर विश्वास ठेवला आहे तो विश्वास सार्थक करणार, रस्ते, पाणी,लाईट, आरोग्य, शाळा यांच्या समस्या सोडवण्यासाठी वेळ आली तर रस्त्यावर उतरणार मागे हटणार नाही, जेथे जेथे अन्याय होत असेल तेथे धावुन जाणार, जनसेवेचे समाजहिताचे काम करणार,प्रत्येक गावात व भागात संघटना बांधणार येत्या काही दिवसात युवासेनेचे काम आपल्याला दिसणार असे सांगितले,



# गतिमंद मुलीवर अत्याचार आरोपीला फाशीची शिक्षा द्या !

## भाजपा महिला पदाधिकाऱ्यांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** गतिमंद मुलीवरील बलात्कार प्रकरणी आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी भाजपा डोंबिवली ग्रामीण मंडळ अध्यक्षा मनिषा राणे यांनी टिळकनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कदम यांच्याकडे केली आहे.



भाजपा ग्रामीण मंडल अध्यक्षा मनिषा राणे आणि माजी नगरसेविका सुनीता पाटील यांनी शिष्टमंडळासह टिळकनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी उपरोक्त मागणी केली. गतीमंद तरूणीवर एका रिक्षा चालकाने बलात्कार केल्याची संतापजनक घटना नुकतीच डोंबिवलीत घडली आहे.

या घटनेतील आरोपी रिक्षा चालक फैजल खान याला टिळकनगर पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयाने 14 एप्रिलपर्यत पोलिस कोठडी सुनावली आहे. टिळकनगर पोलिसांनी सीसीटीव्हीच्या साहाय्याने अटक केली आहे. 9 एप्रिल रोजीच्या रात्री पोलिसांनी आरोपी फैजल खान याला टिळकनगर पोलिसांनी दिवा येथून अटक केली आहे. या प्रकरणात पिडीता गतीमंद असल्याने वेगवेगळ्या अंगाने तपास सुरू आहे.


या घटनेविषयी मनीषा राणे यांनी सांगितले की, राज्यात महायुतीचे सरकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पिडीतेला नक्कीच न्याय मिळवून देतील. त्याचप्रने भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण हे देखील पिडीतेच्या पाठीशी ठामपणे उभे राहतील. तर

माजी नगरसेविका सुनिता पाटील म्हणाल्या, ही घटना निंदनीय आहे, वटिळकनगर पोलिसांनी पिडीतेला न्याय मिळावा यासाठी दिवसरात्र मेहनत घेतली आहे. महिलावर अत्याचार होत आहे. त्याला रोखण्यासाठी काहीतरी ठोस पावलं उचलली गेली पाहिजे. जेणेकरून गुन्हेगारीला आळा बसेल.

# रानसईच्या अपुऱ्या पाणीसाठ्यामुळे उरण शहरात पाणीबाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** एप्रिलमधील वाढत्या तापमानामुळे येथील रानसई धरणातील पाणी साठा कमी होऊ लागला आहे. त्यामुळे धरणात जूनअखेर पर्यंत पुरवठा करण्याचा प्रयत्न एमआयडीसीकडून नियोजन करून केला जात आहे. मात्र ही स्थिती कायम ठेवण्यासाठी नागरिकांनीही या काळात जपून पाण्याचा वापर करावा असे आवाहन एमआयडीसी कडून करण्यात आले आहे.



गेली अनेक वर्षे रानसई धरणातील पाणी साठवणूक क्षमता वाढत नसल्याने उरणच्या नागरिकांवर पाणीकपातीचे संकट वाढू लागले आहे. रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता कमी झाल्याने या धरणातून पावसाळ्यातील साडेतीन महिन्याचे लाखो लीटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे येथील नागरिकांना ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. धरणाची पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेकवर्षे धूळखात बसला आहे. ही स्थिती बदलून उरणला पाणीदार करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

उरण तालुक्यातील नागरिकांना व येथील उद्द्योगासाठी लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जात असून उरणकराना दररोज ४१ दश लक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे. मात्र एमआयडीसी कडे केवळ ३० दश लक्ष लिटर पाणीच असल्याने दररोज १० दश लक्ष लिटर पाणी कमी पडत असल्याने हा पाणी पुरवठा जून महिन्यापर्यंत पाणी पुरवठा करता यावा यासाठी पाणी कपात केली जात आहे. १९६० च्या दरम्यान उरण मध्ये संरक्षण विभागाच्या शस्त्रागारा साठी उरणच्या पूर्व विभागातील दिघोडे परिसरात रानसई धरणाची उभारणी करण्यात आली. याच धरणातून येथील ग्रामपंचायतींनाही पाणी पुरवठा करण्यात येऊ लागला. मात्र हे धरण प्रामुख्याने औद्द्योगिक विभागाला लागणारं पाणी पुरविण्यासाठी तयार करण्यात आले. त्यानुसार शास्त्रागारा नंतर, आलेल्या ओएनजीसीचा तेल शुद्धिकरण प्रकल्प, वीज निर्मितीचा वायू विद्द्युत केंद्र तसेच भारत पेट्रोलियम चा घरगुती सिलेंडर भरणा प्रकल्प या औद्द्योगिक प्रकल्पासाठी त्याच प्रमाणे उरण शहर व नगरपालिका यांनाही पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी रानसई धरणावरच येऊन पडली.

# सुजाण समाज निर्मितीसाठीच नवीन कायदे

## - पोलीस अधीक्षक डॉ.डी.एस.स्वामी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके-अंबाडी :** " भारतीय संसदेने भारतीय न्याय संहिता-2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-2023,भारतीय साक्ष अधिनियम-2023 हे नवीन तीन कायदे पारित केले आहेत.त्यांची अंमलबजावणी दिनांक- 01/07/2024 पासुन सुरू झालेली आहे.




सदर कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठीच जनसामान्यांना कायद्यांची ओळख व्हावी,तसेच महिलांमध्ये जास्त प्रमाणात जनजागृती होण्यासाठीच ठाणे ग्रामीण पोलीस दलातर्फे पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक-11/04/2025 रोजी सायंकाळी-04:00 वाजता भिवंडी तालुका पोलीस हद्दीतील भिवंडी-वाडा रोड लगत कुणाल फार्म हाऊस या ठिकाणी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळेस महिलां बचतगट,आशा सेविका,व गृहिणी यांना खासकरून पाचारण करण्यात आले होते.

याप्रसंगी ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.डी.एस्.स्वामी यांच्या मार्गदर्शन भाषणात बोलताना स्पष्ट केले की,"नवीन कायदे चांगला समाज घडविण्यासाठी उपयुक्त आहेत,नवीन कायदे जनतेपर्यंत पोहचले पाहिजेत,महिला व लहान मुलं यांना कायद्याने अधिक संरक्षण देणे गरजेचे आहे.कायद्याप्रमाणे जनता आणि पोलीस यांचा समन्वय असला पाहिजे.

त्याकरिता पोलीस आणि जनता एकत्र आले पाहिजेत,ज्या समाजामधे वाईट गोष्टी आहेत,त्या संपविण्याचे काम आम्ही करणार आहोत,पोलीसांच्या तक्रारी बिनधोकपणे आमच्याकडे करावी,पोलीस हे जनतेसाठी आहेत,हे जेव्हा होईल त्याचवेळेस खऱ्या अर्थाने कायद्याचे यश असेल.तुम्ही विविध स्वरूपातील सण,उत्सव समारंभ साजरे करीत असता,परंतु पोलीस आपले कुटुंब सोडून आपल्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असतात." अशा अनेकविध बाबींवर आपले मार्गदर्शनपर विचार पोलीस अधीक्षक डॉ.स्वामी यांनी यावेळेस व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक पोलीस उपअधीक्षक राहुल झाल्टे यांनी केले.त्याचप्रमाणे नवीन कायदेविषयक मार्गदर्शन अॅड.ज्योती पाटील यांच्याकडून करण्यात आले.सदर कार्यक्रमात विचार मंचावर सुरेश मनोरे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक), बाळा कुंभार (पोलीस निरीक्षक),विलास कदम (पोलीस निरीक्षक), संदीपान सोनवणे (सहाय्यक पोलीस निरीक्षक), सौ.लंबाते (सहाय्यक पोलीस निरीक्षक),बाळाराम भोईर (सरचिटणीस श्रमजीवी संघटना),प्रमोद पवार (पत्रकार)

सदर कार्यक्रम आयोजनामध्ये महत्त्वाचा सहभाग श्रमजीवी संघटनेचे सरचिटणीस बाळाराम भोईर यांचा होता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने जीवनदीप महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी | १२ एप्रिल २०२५ :** जीवनदीप शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दिनांक 12 एप्रिल 2025 रोजी ०१:०० वाजता ग्रंथालय वाचन विभागामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या वाचनालय विभागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्य, विचारसरणी आणि विविध क्षेत्रातील योगदानावर आधारित ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनात डॉ. आंबेडकर यांचे आत्मचरित्र, संविधान निर्मितीतील कार्य, सामाजिक समता आणि शिक्षणाबाबतचे विचार यावर आधारित पुस्तके व संदर्भ साहित्य मांडण्यात आले होते.संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे यांच्या प्रेरणेने आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कळकटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन यशस्वीपणे पार पडले.विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि आपली मते व्यक्त केली."बाबासाहेबांनी दिलेल्या शिक्षणाच्या संदेशामुळेच आम्ही आज उच्च शिक्षण घेऊ शकतो. त्यांच्या कार्यावर आधारित ग्रंथ प्रदर्शन पाहून अभिमान वाटला," असे बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी जान्हवी शिंदे म्हणाली.बी. कॉम. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी दिनेश भागत म्हणाला, "ग्रंथ प्रदर्शनामुळे बाबासाहेबांच्या विचारांची खोली समजली. त्यांनी घडवलेले संविधान जगातील सर्वोत्तम आहे, याची जाणीव झाली."बी.एस्सी. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी श्रुष्टी देसले म्हणाली, "डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक न्यायासाठीचे योगदान वाचताना मन भारावून गेले. अशा प्रदर्शनांमुळे आम्हाला नव्या प्रेरणा मिळतात."एम.ए. (मराठी) द्वितीय वर्षाचा विद्यार्थी प्रतीक पाटील म्हणाला, "वाचन हेच खरे सामर्थ्य आहे, हे बाबासाहेबांनी पटवून दिले. ग्रंथ प्रदर्शनाने वाचनाची नवीन दिशा दिली आहे."ग्रंथ प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची नवीन दृष्टीने ओळख होण्यास मदत झाली.कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.





# दहा एकर जागेत बहरणार कांदळवन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** वाशी गाव खाडी किनारा आता पुन्हा हिरवाईने नटणार आहे. कांदळवन विभागाने या ठिकाणी सुमारे दहा एकर जागेत नव्याने कांदळवन क्षेत्र निर्माण करण्यासाठी पावले उचलली आहेत.

या भागात २५ मार्च पासून कांदळ राडारोडा काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. हा राडारोडा रस्त्यांच्या कामासाठी वापरावा अशी विनंती नवी मुंबई महानगरपालिकेला करण्यात आली आहे. वाशी गावानजीक असलेल्या खाडी किनाऱ्यावरील मोठा भाग राडारोडा टाकणाऱ्यांनी व्यापला होता. गेले अनेक दशके राडारोडा टाकल्याने येथील कांदळवन मोठ्या प्रमाणात नष्ट झाले होते. 'डेब्रिज माफिया एरिया' अशी या भागाची ओळख झाली होती.

या भागात म्हणजे सर्व्हे क्रमांक १७ येथे प्रचंड राडारोडा पडला होता. त्यात वरचेवर भर पडत होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कांदळवन नष्ट झाले होते. त्यात या ठिकाणी अनधिकृत पाने कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली होती. याच ठिकाणी पुन्हा नव्याने कांदळवन उभे करण्यासाठी कांदळवन विभागाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ४. २० हेक्टर म्हणजेच सुमारे दहा एकर परिसरापैकी २.९ हेक्टरवर कांदळवन उभे राहणार आहे.

सध्या हा राडारोडा काढण्याचे काम वेगात सुरू आहे. या ठिकाणी कांदळ रोपे (Rhizophora mucronate) लावण्यात येणार आहेत तर समुद्री वनस्पती असलेले तिवर (Avicennia offcinalis) नैसर्गिक रित्या उभे राहतील. या ठिकाणी पडलेला राडारोडा हटवून एका ठिकाणी जमा करण्यात येत आहे. तो राडारोडा घणसोली ऐरोली येथील रस्त्यांच्या कामासाठी वापरावा अशी विनंती नवी मुंबई मनपाला कांदळवन विभागाने केली असून त्याला नवी मुंबई महानगरपालिकेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

---------

## यापूर्वीचा प्रयोग यशस्वी

या पूर्वी जून २०२३ ला असाच प्रयोग करण्यात आला होता. तो यशस्वी झाला आहे. वाशी स्टेशन नजीक सर्वे क्रमांक ८४० येथे सुमारे ५० गुंठे जागेवर राडारोडा टाकण्यात आला होता. वर्षानुवर्षे हेच सुरु असल्याने झाडे मृत झाली होती तर पाण्याचा प्रवाह बंद झाला होता. त्या ठिकाणीही पाण्याचा प्रवाह सुरू करण्यात आला आणि कांदळ लागवड करण्यात आली होती. आज तेथे पूर्ण वन उभे राहिले आहे.

# 'छावा' सिनेमाचे बेकायदा प्रक्षेपण - एकाला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छावा' हा २०२५ मधील सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट ठरला आहे. पण चित्रपट इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात लिक झाला आहे. या चित्रपटाच्या १८१८ बेकायदा इंटरनेट लिंक सापडल्या होत्या. त्याप्रकारणी सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून सागर माणिक रांधवन (२६) या तरुणाला पुण्यातील दौंड येथून अटक केली.

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित या ऐतिहासिक चित्रपटात विकी कौशलने मुख्य भूमिका साकारली आहे. हा चित्रपट व्हॅलेंटाइन डे म्हणजेच १४ फेब्रुवारी रोजी जगभरात प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाच्या लिंक बेकायदेशीरित्या इंटरवेटवर अपलोड करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. आतापर्यंच्या तपासणीत १८१८ बेकायदा लिंक इंटरनेटवर आढळल्या आहेत. त्याप्रकरणी दक्षिण प्रादेशिक सायबर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३०८ (३) तसेच कॉपीराईट अ ॅक्टच्या कलम ५१, ६३, ६५ (अ) सिमेमॅटोग्राफी कायदा ६ (अ) (अ) व माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायदा कलम ४३ व ६६ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात शेतकरी मेळावा व कार्यशाळा संपन्न

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●






अलीकडच्या काळात बदलत्या हवामानामुळे शेतीला मोठ्या प्रमाणात फटका बसतोय त्यामुळे शेतकरी मोठ्या चिंतेत दिसतोय. या पार्श्वभूमी वरती शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे आज दिनांक11 एप्रिल 2025 रोजी भूगोल विभाग व गोसेवा गतीनिधी कल्याण जिल्हा आयोजित मान्सूनपूर्व शेतकरी मेळावा व कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळेस मार्गदर्शनासाठी स्वयंसेवक कोकण प्रांत गोसेवा प्रतिनिधी हरीओमजी शर्मा, माजी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन ठाणे डॉ. विनोद राईकवार, तालुका कृषी अधिकारी कुमार जाधव, पंचायत समिती कल्याणचे कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे यांची प्रमुख उपस्थित होती. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून उपस्थितांना शेती संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच अलीकडच्या आधुनिक काळात प्रचंड प्रमाणात होणाऱ्या वृक्षतोडीमुळे अनेक प्राणिमात्रांचे जीवन धोक्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे तरुणांमध्ये या गोष्टीची जाणीव करून देऊन त्यांना, मातेचा दर्जा असलेल्या गाईंचे, त्याचबरोबर इतर प्राणीमात्रांचे रक्षण करण्यासाठी प्रोत्साहित केले.तसेच सेंद्रिय शेती,गोशाळा व्यवस्थापन या याविषयी माहिती दिली.यावेळेस जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष बाळाराम कोर, भाजपा सरचिटणीस चिंतामणी मगर,शिवसेना जिल्हा समन्वयक संतोष सुरोशी,दिलीप बुटेरे, अरविंद मिरकुटे, कृषी मित्र भगवान तारमले ,भाजपा युवा अध्यक्ष जयराम कोर, पुंडलिक मिरकुटे, रुपेश पितांबरे ,कान्हा घरात ,मुकेश शेलार, दिलीप टेंबे,प्रकाश मिरकुटे, प्रणिता टेंबे, राजेश भोईर, कमलाकर राऊत तसेच जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. बी.कोरे, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, संचालक प्रशांत घोडविंदे , भूगोल विभाग प्रमुख डॉ.विजय हेरोडे, प्रा. राजू धसाडे यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला

# भादाणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मेघा भोईर यांची बिनविरोध निवड

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**पडघा दि. ११ (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील पाच गावांमध्ये विस्तार असलेल्या व ११ सभासद संख्या असलेल्या भादाणे गृप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मेघा भोईर यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. मावळत्या उपसरपंच वंदना शेलार यांनी आपसात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार सरपंच जोत्स्ना भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी एक खास सभा ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आली यावेळी उपसरपंच पदासाठी मेघा प्रदीप भोईर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदावर बिनविरोध निवड झाल्याचे घोषीत करण्यात आले.यावेळी वंदना शेलार, नितीन शेलार, दुर्गेश गुप्ते, दर्शना ठाकरे, विमल वाघे हे ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. तर निवडणूकीसाठी सचीव म्हणुन ग्रामपंचायत अधीकारी एम. बी. जाधव यांनी काम पाहिले तर उपसरपंचपदी मेघा भोईर यांची निवड होताच त्यांच्या कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतेषबाजी केली.यावेळी शिवसेना( उबाठा) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर,विभागप्रमुख भास्कर माळी, भादाणे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रमेश शेलार, प्रदीप भोईर, तळवली सोसायटीचे सभापती काशीनाथ शेलार पडघा सोसायटीचे सभापती रमेश पाटील उद्योजक अजय पाटील, दिनेश भोईर, शरद पाटील, अरूण गोरले, जगन राऊत, संदीप शेलार समाजसेवक पंकज भोईर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा गुणगौरव पुरस्कार सोहळा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड -प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ठाणे व कोकण विभागाच्या वतीने गुणगौरव पुरस्कार सोहळा, पत्रकार मेळावा व आरोग्य शिबिराचे आयोजन (दि.१० एप्रिल) रोजी करण्यात आले होते. ठाण्यातील तमाम पत्रकारांनी तसेच नागरिकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद द्विगुणित केला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे प्रदेश संघटक नितीन मनोहर शिंदे यांच्या नियोजनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर म्हणून विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष प्रवीण सकपाळे,ठाणे विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय केळकर,

धडक कामगार युनियनचे संस्थापक विख्यात कामगार नेते तथा मुंबई मित्र वृत्त मित्रचे समूह संपादक अभिजीत राणे, ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणावाला, ज्येष्ठ संपादक कैलास म्हापदी, ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर करडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष म्हणून कोकण व ठाणे विभागाचे सल्लागार प्रमोद इंगळे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. भारतीय संविधानाचे जनक महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.




## मुरबाड मधील ज्येष्ठ पत्रकार सुधीर पोतदार व आदर्श सरपंच रेश्माताई घरत यांना पुरस्कार प्रदान..!

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ठाणे व कोकण विभागाच्या वतीने गुणगौरव पुरस्कार सोहळा ठाण्यात संपन्न झाला या मध्ये मुरबाड मध्ये गेली ३० वर्षा पेक्षा जास्त पत्रकारिता करीत असणारे दैनिक सामना, दैनिक लोकमत सारख्या अग्रगण्य वर्तमानपत्रात बातमीदार म्हणून काम केलेले ज्येष्ठ पत्रकार सुधीर पोतदार यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. तर कान्होळ बोरीवली ग्रामपंचायतीच्या आदर्श सरपंच रेश्मा बाळा घरत यांनाही आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला. आपल्या ग्रामपंचायती मधील गावांच्या विकासासाठी सरपंच रेश्मा घरत यांचे काम उल्लेखनीय आहे. मुरबाड सारख्या ग्रामीण भागातील दोन गुणवंतांचा सन्मान ठाणे येथे करून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने आपले परमकर्तव्य पूर्ण केले असल्याची भावना त्यांनी व्यक्त करून राज्य पत्रकार संघाचे आभार दोन्ही पुरस्कारकर्त्यांनी मानले आहेत.**

ठाणेकरांसाठी आयोजित केलेल्या मोफत आरोग्य शिबिरास आरोग्य धनसंपदाचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या तपासण्या व अल्प दरामध्ये चष्म्याचे वाटप करण्यात आले, तसेच गुणोत्तरावर पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या सोहळ्याचे सन्मानमूर्ती म्हणून जिल्हा परिषदेच्या माहिती जनसंपर्कच्या अधिकारी रेश्मा आरोटे, ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागाचे अधिकारी कुंदन सूर्यराव, निवृत्त माहिती व जनसंपर्क अधिकारी सुरेखा पाटील, ज्येष्ठ पत्रकार छायाचित्रकार सुभाष जैन, आरोग्य धनसंपदा संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, परिवर्तन महिला व बाल विकास संस्थेचे अध्यक्ष सोनिया गिल, लोकमत वृत्तपत्राचे पत्रकार देवेंद्र जाधव, शूर मराठाचे संपादक गोरखनाथ शिंदे, डेमोक्रेटीक इंडिया पोर्टलचे संचालक अतुल तिवारी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे माजी ठाणे शहर अध्यक्ष राजन पाटील, सामाजिक सांस्कृतिक राजेंद्र गोसावी, ज्येष्ठ पत्रकार भीमराव शिरसाट, फिजिओथेरपिस्ट डॉ. अशोक मेहता, मुरबाड येथील ज्येष्ठ पत्रकार सुधीर अनंत पोतदार, आदर्श सरपंच रेश्मा बाळा घरत, मीनाक्षी देशमुख, दिनेश ठाकरे, निखिल भोईर, साम टीव्हीच्या पत्रकार कांचन सोनवणे, युवा उद्योजक रोशन तांडेल वैभव कदम, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभागीय संघटक अरुण बिराजदार, प्रणय शेलार, उत्कृष्ट संबळ वादक यज्ञेश बाबर तसेच ठाणे नागरिक या वृत्तपत्रास गुणगौरव पुरस्कार सोहळयास निमित्त मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी प्रकाशित केलेल्या पत्रकार संघाच्या माहिती पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले तर पत्रकार संघाच्या पत्रकारांना ही मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ठाणे व कोकण विभागाचे पदाधिकारी, जिल्हा संघटक संतोष राऊत, मुरबाड तालुका अध्यक्ष दिलीप पवार, उपाध्यक्ष सुभाष जाधव, कार्याध्यक्ष विलास जाधव, कोषाध्यक्ष कु. स्वप्नाली भवार, इलेक्ट्रॉनिक मिडिया सेलचे अध्यक्ष चेतन पोतदार, संघटक किशोर पवार, व कल्याण तालुका अध्यक्ष तानाजी लोणे, भिवंडी तालुका अध्यक्ष मनोहर लोणे , बदलापूर शहर अध्यक्ष तुषार डबरे यांच्या सह ईतर सर्व तालुकाध्यक्ष यांच्या उपस्थितीत गुणगौरव पुरस्कार सोहळा, पत्रकार मेळावा व आरोग्य शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी शाळाबाह्य मुले व असाक्षरांचे सर्वेक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**ठाणे : प्रतिनिधी** राज्यातील सर्व दाखलपात्र विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दरवर्षी शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात येते. तसेच सापडलेल्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे नियोजन केले जाते. यावर्षी सुद्धा शैक्षणिक वर्ष 2025 - 26 करीला शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे 11 ते 28 एप्रिल 2025 या कालावधीत सर्वेक्षण केले जाणार आहे. शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी मनपा व खाजगी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व म ुख्य ाध्य ाप क ांन ा परिपत्रकाद्वारे कळविले आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 राज्यात 01 एप्रिल 2010 रोजी लागू करण्यात आलेला आहे. या कायद्यानुसार वय वर्ष 06 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा हक्क प्राप्त



झालेला आहे. यात शाळेत कधीच दाखल न झालेली बालके, शाळेत नियमित न जाणारी बालके, ज्यांनी शाळेत प्रवेश घेतलेला नाही, ज्या बालकांनी प्रवेश घेऊन प्राथमिक शिक्षण पूर्ण केले नसेल अशा व एका महिन्यापेक्षा अधिक काळ सातत्याने अनुपस्थित राहत असतील अशा बालकांना शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळाबाह्य असे संबोधले जाते. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक बालकास त्याचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत नजीकच्या शाळेत मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क आहे. ही बाब विचारात घेऊन सर्व शाळांनी शाळेच्या कार्यक्षेत्रातील सर्व 6 ते14 वयोगटातील दाखल पात्र मुलांना शाळेत दाखल करून घेणे बंधनकारक आहे. यासाठी अशा बालकांचा शोध घेण्यासाठी दिनांक 11 एप्रिल 2025 ते 28 एप्रिल 2025 या कालावधीत दाखलपात्र व शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे. तसेच याच कालावधीमध्ये केंद्र सरकार पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत १५ वर्षावरील असाक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण करून त्यांची नोंद उल्लास ॲपवर करण्यात येणार आहे. यासाठी सर्व शिक्षक, पालक व नागरिक यांनी सहकार्य करावे असे ठाणे महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी आवाहन केले आहे.

# गिरीश कंटे यांना 'साहित्य रत्न' पुरस्कार जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गिरीश कंटे यांना " साहित्य रत्न " पुरस्कार जाहीर!मुरबाड-प्रतिनिधी उल्हास प्रभात ह्या वृत्तपत्राच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना त्या क्षेत्रातील रत्न म्हणून पुरस्कार देण्यात येतो.ह्या वर्षी हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी बदलापूर येथे संपन्न होत आहे. आपल्या लेखणीचे बळावर इतिहास ,बोली भाषा,लोक संस्कृती आणि उपेक्षित वंचित असलेल्या कर्मयोग्यांचे चरित्र लेखन करणारे मुरबाड मधील लेखक गिरीश कंटे यांना जाहीर झाला आहे.



ह्या पुरस्कार वितरण सोहळयास मुरबाड विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन कथोरे, दैनिक सकाळ समूहाचे संपादक राहुल गडपाले,परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले,बिल्डर असोशियशन चे अध्यक्ष संजय जाधव हे उपस्थित राहणार असल्याचे उल्हास प्रभात चे संपादक डॉ.गुरुनाथ बनोटे यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात मांडले आहे.

राज्यभरातून ५७ व्यक्तींना विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत.त्यापैकी गिरीश कंटे यांची साहित्य रत्न म्हणून पुरस्कारासाठी निवड केली आहे.आजवर त्यांची विविध विषयावर पंधरा पुस्तके प्रकाशित केली असून , अनेक साहित्य संस्थांशी त्यांचे जिव्हाळयाचे संबंध आहेत.दोन महिन्यापूर्वी साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्या बद्दल मुरबाड रत्न म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला होता.

# मळेघर ग्रामपंचायतच्या ग्रामसेवकला लाच घेताना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण तालुक्यातील मळेघर ग्रामपंचायतचे ग्रामसेवक परमेश्वर सवाईराम जाधव (वय-४८) यांना पाच हजार रूपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. मळेघर ग्रामपंचायत मधील वडगाव येथील एका ज्येष्ठ नागरिकाने आपल्या घराचा असेसमेंट उतारा मिळण्याकरीता मळेघर ग्रामपंचायतीत १७ मार्च रोजी अर्ज केला होता. सदरचा असेसमेंट यांना कोर्टाचे कामकाजासाठी तसेच एम.एस.इ.बी. येथे सादर करण्यासाठी पाहिजे होता. या ज्येष्ठ नागरिकाला ग्रामपंचायत मध्ये वारंवार फेरी मारायला जमत नसल्याने त्यांनी असेसमेंट उतारा काढण्याचे काम त्यांच्या वकिलांना दिले.

वकिलांनी ग्रामसेवकांशी संपर्क साधला असता ग्रामसेवक परमेश्वर जाधव यांनी पाच हजार रुपये लाचेची मागणी केली. यामुळे संतप्त झालेल्या ज्येष्ठ नागरिकाने आपल्या वकिलामार्फत नवी मुंबई लाच लुचपत खात्यामध्ये तक्रार केली. पोलिस अधीक्षक शिवराज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक संजय गोविलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरुंधती येळवे, संतोष पाटील, उपनिरीक्षक जाधव, बासरे, चौलकर यांच्या पथकाने ११ एप्रिल रोजी सापळा रचून ग्रामसेवक परमेश्वर सवाईराम जाधव यांना ५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

# पद्मविभूषण पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या नावामुळे संस्थेचा नावलौकिक होणार - तहसीलदार सचिन खाडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी) :** कौशल्य विकास रोजगार उद्योजकता, व नावीन्यता विभाग व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या म्हसळा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला" पद्मविभूषण पांडुरंग शास्त्री आठवले" यांचे नाव देण्यात आले आहे या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नामकरण सोहळ्याला स्वाध्याय परिवाराचे हजारो सदस्य उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.म्हसळाचे तहसीलदार सचिन खाडे व स्वाध्याय परिवाराचे कृतिशील भाऊ चंद्रकांत कुडतरकर यांच्या हस्ते या पवित्र वास्तूचा नामकरण सोहळा संपन्न झाला यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचा यथोचित सन्मान शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

यावेळी तहसीलदार सचिन खाडे म्हणाले या नामकरण सोहळ्याला उपस्थित असणे हेच माझे भाग्य आहे आणि हे नामकरण म्हणजे म्हणजेच रायगडचा गौरव वाढविणारा आहे कारण पांडुरंग शास्त्री यांचं स्वाध्याय परिवाराच कामच विश्वात आहे आजपासून या संस्थेचं नामकरण, "पद्मविभूषण पांडुरंगशास्त्री आठवले औद्योगिक प्रशिक्षण संस्था" असे झाले आहे म्हसळा तालुक्यासाठी आज हा गौरवाचा दिवस आहे असेही भावपूर्णतेने सांगितले. यावेळी व्यासपीठावर स्वाध्याय परिवाराचे प्रतिनिधी म्हणून चंद्रकांत कुडतरकर, श्याम शिंदे ,संजय जहागीरदार, लीलाधर तांडेल, सतीश भाऊ, कमलेश शहा, सदाशिव पाटील, गणेश मोकल, प्रशांत देशमुख, विश्वनाथ घरत, मकरंद बारटक्के, ॲड. आत्माराम पाटील , पत्रकार मधुकर रिकामे, पोलीस निरीक्षक संदीप काळे आदी मान्यवर उपस्थित होते अनेक मान्यवरांनी आपले मनोगते व्यक्त केली या कार्यक्रमाला स्वाध्याय परिवाराचे हजारो ताई, भाऊ उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार मधुकर रिकामे यांनी केले तर सर्वांचे आभार कांबळे सर यांनी मानले .

# निवृत्त वीज कर्मचाऱ्यांचे स्नेहसंमेलन संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**कल्याण :** वीज कंपनीतून निवृत्त कर्मचाऱ्यांचा आनंद मेळावा रिटायर पर्सन ग्रुपच्या वतीने दलापूर येथील शेखर ठाकूर यांच्या फार्म हाऊस येथे मेळावा भरवण्यात आला. मेळाव्याचे अध्यक्ष जे आर पाटील व ज्येष्ठ नेते एस जी दिनकर, अनिता झोपे, विठ्ठल पाटील, श्याम म्हात्रे, दिवाकर गोळपकर उपस्थित होते.

मेळाव्याला 70 निवृत्त कर्मचाऱ्यांनी मनोगते व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला व सर्वांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार




करण्यात आला. आमदार खासदार यांना भरघोस पेन्शन मिळते परंतु वीज कर्मचाऱ्यांना सरकारने, कंपनीने वाऱ्यावर सोडण्याची खंत व्यक्त करण्यात आली. निवृत्तीनंतर प्रत्यक्ष भेटी झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद होता. आठ वर्षात प्रथमच आनंद मिळण्याचा उत्साह होता त्यामुळे नाच, गाणी, कविता, जलस्नान आणि फोटोग्राफी मध्ये गुंग झाले होते. 73 पैकी 70 निवृत्त कर्मचारी उपस्थित होते या सर्वांचे जे आर पाटील यांनी आभार मानले व पुढील आनंद मेळावा मोठ्या प्रमाणात करण्याचे ठरवले.

निवृत्त कर्मचाऱ्यांचा आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी जे. आर. पाटील, शाम म्हात्रे, विलास मार्के, एस जी दिनकर, सुभाष भोसले, तेलंग, प्रभाकर देशमुख, शांताराम आंब्रे, सोनकुसरे, उमा निपाणे, विठ्ठल पाटील, सोनकुसरे, पाटणकर या सर्वांनी खूप मेहनत घेतली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com